<u>प्रकरण पाचवे</u>

# उपसंहार

## प्रकरण पाचवे

# उपसंहार

दक्षिण भारतातील जैनांच्या ऐतिहासिक परंपरेची सुरूवात सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांच्या काळापासून झाली असे मानली जाते. सम्राट चंद्रगुप्तांनी आचार्य भद्रबाहू यांच्या संघाबरोबर श्रवणबेळगोळ येथे सल्लेखणापूर्वक मरण स्विकारले. दक्षिणेत जैन धर्माचा प्रचार व प्रसार झाल्यावर कन्नड, तामीळ व मराठी भाषेत जैनांनी विपूल साहित्य निर्माण केले. प्रामुख्याने साहित्य, धर्म, दर्शन, न्याय, काव्य नाट्य, कथा, शिल्प, वास्तूकला, आयुर्वेद यावर भरपूर जैन साहित्य उपलब्ध आहे.

दक्षिणेतील पल्लव, सातववाहता चोळ, गंग, रट्ठ, पाण्ड्य इत्यादी अनेक राजवटींनी जैन धर्माचा राजाश्रय दिला. गंग वंशीय राजाचे सेनापती चामुण्डराय यांच्या काळात इ.स. ९८१ मध्ये ५८ फूट उंचीच्या बाहुबलीच्या मूर्तीची स्थापना झाली. भारतातील जैनांच्या एकूण लेणी, गुंफा, मंदिरे यापैकी ३/४ पेक्षा जास्त वास्तू, शिल्पे महाराष्ट्रात होती. कोल्हापूर, पैठण, शिरपूर, स्तवनिधी ही अतिशय क्षेत्रे, तर नांदणी, लातूर, कोल्हापूर, कारंजा, हुमच्या, नागपूर ही प्रमुख ठिकाणी भट्टारक पीठांची केंद्रस्थाने म्हणून प्रसिद्ध आहेत. या भट्टारक पिठांची जैनांमधील जाती व पोटजाती बांधल्या गेल्या आहेत. दक्षिणेतील जैन समाज, चतुर्थ, पंचम, कासार, बोगार, शेतवाल, उपाध्याय या पोटजातीमध्ये विभागला आहे. पंचम जातीचे जैन लोक लक्ष्मीसेन मठाचे भट्टारक श्री लक्ष्मीसेन महाराज यांच्या वर्चस्वाखाली तर चतुर्थसमाजाचे लोक नांदणी येथील जिनसेन मठाचे भट्टारक श्री जिनसेन यांचे अनुयायी आहेत. कासार समाज कर्नाटकातील हुमच्या येथील देवेंद्रकिर्ती भट्टारकांचे अनुयायी आहेत. तर शैतवाल समाज मराठवाड्यातील लातूर मठाचे विशालकिर्ती भट्टारक

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

यांचे अनुयायी आहेत. पौराहित्य करणारे उपाध्याय चतुर्थ आणि पंचम आहेत, त्यांच्यावर अनुक्रमे श्री जिनसेन भट्टारक श्री जिनसेन व श्री लक्ष्मीसेन भट्टारक यांच्या वर्चस्वाखाली आहेत.

जैन संस्कृतीचा दक्षिणेत विकास होताना अनेक सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय आव्हानांना त्यांना तोंड द्यावे लागले. तरीही अल्पसंख्यांकजणारंनी आजही जैन आचार्य 'आर्यिका व 'श्रावक श्राविका' यांच्या चतु:संघाच्या माध्यमातून आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. १३ व्या शतकातील मुसलमानी अंमलानंतर ब्रिटीशांची सार्वभौम सत्ता भारतात स्थिरावली. या दोन्ही राजवटींचे भारतातील विविध धर्मांच्या व जातींच्या समाजजीवनावर वेगवेगळे परिणाम झाले. अर्थात यामध्ये सामाजिक बदलही अपेक्षित होते. १८१८ नंतर पेशवाईच्या अस्तापासून महाराष्ट्रात स्थिरावलेल्या ब्रिटीश अंमलाचा परिणाम म्हणून १९ व्या शतकातील सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जैन समाजालाही मार्गक्रमण करावे लागले. साहजिकच आधुनिकता व मध्ययुगीन धार्मिक संकल्पना यांच्या संघर्षातून मार्गक्रमण करीत असताना १९ व्या शतकातील सामाजिक, पुर्नरुज्जीनवादी चळवळींचा परिणाम इतर समाजाप्रमाणेच जैन समाजावरही झाला.

ब्रिटीश अंमलाखालील दक्षिण भारतात मुंबई इलाखा हा प्रशासकीय विभाग होता. सिंध ते कारवार इतका मोठा विस्तार होता. त्यापैकी दक्षिण महाराष्ट्रात बेळगाव, कारवार, धारवाड, विजापूर, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यांचा समावेश होई. कोल्हापूर व सांगली येथे संस्थानिकांची अधिसत्ता होती. बेळगाव, धारवाड, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यात जैन लोकांची संख्या भारतातील इतर ठिकाणापेक्षा अधिक होती. बेळगाव जिल्ह्याचा उत्तर भाग, कोल्हापूर जिल्ह्याचा पूर्व भाग व सांगली जिल्ह्याचा पश्चिम भाग यामध्ये राहणारे

ग्रामीण जैन शेती व्यवसायात गुंतलेले होते. तर सांगली, कोल्हापूर, धारवाड, हुबळी, बेळगाव या शहरातील वास्तव्य करणारे जैन लोक व्यापारात अग्रेसर होते.

कोल्हापूर संस्थानात छ. शाहू यांनी १८९४ मध्ये सत्तेवर येऊन १९२२ पर्यंत २८ वर्षे राज्य केले. हा कालखंड महाराष्ट्रातील सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा होता. त्यांनी नियोजनपूर्वक केलेल्या बहुविध सुधारणांमुळे कोल्हापूर संस्थानात अमूलाग्र क्रांती घडून आली. तसेच प्रशासन, शेती, उद्योगधे, शिक्षण इत्यादी सुधारणांपैकी त्यांनी शैक्षणिक सुधारणांवर अधिक भर दिला. शहरात राहून ग्रामीण विद्यार्थ्याला शिक्षण मिळविण्यासाठी वसतीगृहाची स्थापना केली व वेगवेगळ्या समाजांची शिक्षणविषयक संस्था व उपक्रमांना आर्थिक सहाय्य केले. १९०२ मध्ये कोल्हापूर संस्थानात शिक्षणात मागासलेल्या जातींसाठी ५० टक्के आरक्षण नोकऱ्यांमध्ये देण्यात आले.

सामाजिक विषमतेमुळे वरिष्ठ समाज शिक्षणावर प्रभूत्व ठेऊन आहे. तर ग्रामीण ब्राह्मणेत्तर व शहरी ब्राह्मणेत्तर समाज अज्ञानाने मागासलेला आहे. याची जाणीव छ. शाहूंना वेदोक्त प्रकरणानंतर अधिक तीव्रतेने झाली. मुंबईचे हिराचंद गुमानजी जैन बोर्डिंग पाहिल्यानंतर (१८९९) त्यांच्या मनात आपणही त्या-त्या समाजाला जातीनिहाय वसतीगृहे सुरू करून दिली तर सर्वसमाजाचे विद्यार्थी जातीनिहाय आपआपल्या समाजाच्या मदतीने शिक्षण घेऊ शकतील. अशी योजना त्यांनी आखली. या योजनेमध्ये १९०१ ते १९२२ सालापर्यंत अनेक जातीनिहाय वसतीगृहांची स्थापना झाली. त्यामध्ये १९०१ ला मराठा समाजाचे 'महाराणी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' स्थापन करण्यात आले.

दक्षिण महाराष्ट्रातील जैन समाजाच्या धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीसाठी क्षेत्र स्तवनिधी येथे ३ एप्रिल १८९९ ला दक्षिण भारत जैन सभा स्थापन झाली. त्यामध्ये श्री. आण्णासाहेब लट्ठे, श्री. आण्णाप्पा चौगुले हे दोघे आंग्लशिक्षित युवक या सभेत कार्यरत

होते. छ. शाहूंनी या दोघांना सर्वतोपरी मदत करण्याचे ठरवून जैन दिगंबर बोर्डिंग काढण्यास प्रवृत्त केले. मुंबईचे शेठ माणिकचंद हिराचंद जव्हेरी यांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे १९०५ साली कोल्हापूर दिगंबर जैन बोर्डिंगची इमारत पुर्णत्वाला गेली. यावेळी छत्रपती शाहूंनी चौफाळ्याचा माळ ही विस्तीर्ण जागा मराठा समाजाच्या व्हिक्टोरिया बोर्डिंगच्या विस्ताराला न देता जैन बोर्डिंगच्या इमारतीसाठी देऊ केली. यातच छत्रपती शाहूंच्या आपल्या राज्यातील सर्व धर्माच्या प्रजेबद्दलची सहिष्णू वृत्ती दिसून येते. त्यामुळे १९०५ ला जैन बोर्डिंग कोल्हापूर नव्या जागेत स्थलांतरी झाले. विसाव्या शतकातील जैन समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक क्रांतीला सुरूवात झाली.

दक्षिण भारत जैन सभेत १९०७ मध्ये सभेच्या कामकाज विषयक नियम तयार करून सभेची घटना निश्चित केली. त्यामध्ये झालेल्या काही दुरूस्त्यांनुसार १९६२ मध्ये सभेचे कामकाज चालविले. स्वातंत्र्योत्तर काळात कर्नाटक व महाराष्ट्र वेगळा झाला. बेळगाव, हुबळी, कर्नाटकात व सांगली, कोल्हापूर व महाराष्ट्रात आले. त्यामुळे १९६३ च्या घटनेत कार्याचा विस्तार व व्याप वाढल्याने दक्षिण महाराष्ट्र जैन सभेचे रूपांतर दक्षिण भारत जैन सभेत करण्यात आले.

दक्षिण भारत जैन सभेचे शैक्षणिक ध्येय हे समाजातील गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शिकवून शहाणे करणे हे असल्याने सभेने आपल्या कार्यात वसतीगृहांची वाढ व विद्यार्थी यांच्याकडे नियोजनपूर्वक लक्ष दिले. घटनेमध्ये १६ ते २३ ही कलमे स्कॉलरशिपसंबंधी तर २४ ते २७ कलमे विद्यार्थी वसतीगृहासंबंधी होती. स्कॉलरशिपसंबंधी किती रक्कम वाटावी, ती कशी वाटावी तसेच स्कॉलरशीप मागणीचे अर्ज मागवावेत याचे अधिकार दक्षिण भारत जैन समेच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाकडे होते. स्कॉलरशीप समितीने स्कॉलरशीप दिल्यावर त्यासाठी मध्यवर्ती कमिटीची मान्यता आवश्यक असे. कोणता शिक्षणक्रम घेणाऱ्या

विद्यार्थ्यास अग्रक्रम द्यावा यासंबंधी मध्यवर्ती कमिटीचे मत निर्णायक मानले जात असे. ही स्कॉलरशीप विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी दिली जात असे. त्यामुळे नियम क्रमांक २२ नुसार विद्यार्थ्यास आपला शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर व अर्थार्जन सुरू झाल्यावर रक्कम कोणत्या पद्धतीने व्याजाखेरीज परत करावी याच्याविषयी माहिती दिली आहे. रक्कमविषयी परतफेड ही विद्यार्थ्यांची नैतिक जबाबदारी होती. इतक्या व्यवस्थितपणे स्कॉलरशीप घटनेचे नियम करून त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या.

घटनेमध्ये वसतीगृहासाठी नियम नमूद केले आहेत. त्यामध्ये प्रगती जिनविजयाचे आजिव सभासद होणे, वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी धार्मिक शिक्षण घेणे, प्रत्येक वसतीगृहाला ग्रंथालय असणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीकरिता योग्य शिक्षकाची निवड करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या शारिरीक व मानिसक संतुलनाकडे लक्ष देणे; हे नियम नमूद केले आहेत. त्यामुळे सभेच्या कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना त्यानुसार कार्यवाही करणे पुढील कालखंडात शक्य झाले. दक्षिण भारत जैन सभेने १९०५ मध्ये दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूर याची स्थापना केली. त्यानंतर दिगंबर जैन बोर्डिंग हुबळी (१९०५), माणिकबाग दिगंबर जैन बोर्डिंग, बेळगाव (१९१५), रा.द. दावडा दिगंबर जैन बोर्डिंग सांगली (१९४२), दिगंबर जैन बोर्डिंग इचलकरंजी (१९८६) अशी विद्यार्थी वसतीगृहाची स्थापना विसाव्या शतकात करण्यात आली. या सर्व बोर्डिंगचे संचलन तेथील स्थानिक पदाधिकाऱ्यांमार्फत केली जाते. प्रत्येक जैन बोर्डिंगसाठी चेअरमन, सेक्रेटरी, सुप्रीटेंडेंट यांची ठराविक काळासाठी नेमणूक केली जाते. चेअरमन, सक्रेटरी त्या त्या वसतीगृहाच्या परिसरातील स्थानिक मान्यवर कार्यकर्ते असतात. बहुतांशी या बोर्डिंगचे माजी विद्यार्थीच नंतरच्या काळात या वसतीगृहांचे व्यवस्थापन पाहतात. ज्या मातृसंस्थेने जीवनात आपल्याला शिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे केले त्या संस्थेचे ऋण हे सर्व पदाधिकारी कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता सेवाव्रत या भूमिकेतून काम करतात. हीच दक्षिण भारत जैन सभेच्या वसतीगृहांतून निर्माण झालेल्या

धनिक विद्यार्थ्यांकडून वसतीगृहांना व समाजाला मिळालेली पोहोच पावती आहे. विद्यार्थी वसतीगृहाप्रमाणेच दक्षिण भारत जैन सभेचे सर्व पदाधिकारी आपआपल्या भागातील कार्याची जबाबदारी स्वेच्छेने व विनामोबदला उचलतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी वसतीगृह अतिशय परिश्रमपूर्व परंपरा जपून चालविण्याचे प्रयत्न केले जाते.

१९०५ साली स्थापन झालेले कोल्हापुरातील जैन बोर्डिंग हे दक्षिण भारत जैन सभेच्या सर्व कार्यकर्त्यांचे व कार्याचे महत्त्वपूर्ण केंद्र शंभर वर्षात बनले आहे. छ. शाहू महाराजांच्या काळात सुरू झालेल्या विद्यार्थी चळवळी, सत्यशोधक समाजाच्या चळवळी, नवनवीन उपक्रम यांचे केंद्रस्थान म्हणून या वसतीगृहाकडे पहावे लागेल. १९०८ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील या वसतीगृहाचे विद्यार्थी होते. त्यांनी शिक्षण फंड गोळा करण्यासाठी गावोगावी फिरून या वसतीगृहासाठी ७० रुपयांची आर्थिक मदत गोळा केली होती. विद्यार्थी सुट्टीमध्ये स्वत:साठी, स्वत:च्या शिक्षण खर्चासाठी मुष्ठीफंड, धान्यफंड गोळा करीत असत. यामध्ये ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडे पैसा नसे पण आपल्या शेतातून आलेल्या धान्यातून एक मूठभर धान्य शिक्षणासाठी मदत मागणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्याचे औदार्य ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडे होते. त्यामुळेच ते दारात पोती घेऊन फिरणाऱ्या गरिब मुलांना मूठभर तरी धान्य देत असत. धनिक पैसा, तर शेतकरी धान्य देत असत. यातून सुरूवातीच्या काळात या विद्यार्थ्यांचा चरितार्थ चालत असे. आण्णासाहेब लठ्ठे बोर्डिंगचे सुप्रिटेंडेंट असताना त्यांनी अधिक्षकाचे निवासाचे काम व इतर काही इमारती विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून बांधून घेतल्या होत्या. त्यामुळे कर्मवीरांना 'कमवा व शिका' या योजनेचे ज्ञान मिळाले. रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी संस्था स्थापन करून सर्व गरीब मुलांना शिक्षणाची सोय केली. आज ही रयत शिक्षण संस्था संपूर्ण महाराष्ट्रभर आपले जाळे पसरून आले. या संस्थेत मोठ्या पदावर काम करत असलेले मा. बी. बी. पाटील हे १९८२ ते २००१ या काळात दक्षिण भारत जैन सभेचे चेअरमन होते.

१९०९ मध्ये कोल्हापूर बोर्डिंगला बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी भेट दिली. त्यांनी मार्गदर्शनाचा लाभ तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी घेतला. शिक्षणाबरोबरच बोर्डिंगमध्ये शेतकरी औद्योगिक प्रदर्शन भरविले गेले. कारण लौकीक शिक्षणासोबतच व्यवहारीक व व्यावसायिक शिक्षण मिळाले तरच भविष्य काळात व्यवसायाच्या दृष्टीने विद्यार्थी तयार होतील याचाही प्रयत्न वसतीगृहातून केला गेला. स्पर्धा परीक्षा, व्यवसाय शिक्षण यांच्यामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या आयुष्याची दिशा याला वसतीगृहाद्वार वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. कोल्हापूर बोर्डिंगला नुकतीच शंभर वर्षे होत आहे (ऑगस्ट २००५). चार ते पाच पिढ्या या वस्तीगृहातून शिकून समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत झाल्या आहेत. या वसतीगृहातील एक विद्यार्थी डॉ. ए. टी. शेरीकर हे नागपूर येथील पशू विज्ञान व मत्स्यव्यवसाय विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून नियुक्त झाले आहेत. या वसतीगृहातून अनेक वकील, डॉक्टर, प्राध्यापक याचप्रमाणे राजकारणाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात व ग्रामीण भागात काम करणारे नेतृत्व या संस्थेतून समाजाला मिळाले आहे. ॲड. के. ए. कापसे हे या बोर्डिंगचे विद्यार्थी आहेत. जे आज 'देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळा'चे, प्रतिथयश कॉलेज, महावीर कॉलेजचे चेअरमन आहेत. आजही पूर्वीच्याच उत्साहाने या वसतीगृहाच्या कार्यात त्यांचा सहभाग असतो.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचे प्रयत्न येथे झाले. १९१२ ते १६ या काळात वसतीगृहातील राजाराम कॉलेजमध्ये शिकणारे विद्यार्थी संस्थानाची शिष्यवृत्ती घेऊन, इटलीला ड्रॉईंगचे शिक्षण घेण्यासाठी गेले. विद्यार्थ्यांना प्रेरणा म्हणून या बोर्डिंगच्या आवारात श्रीयुत माणिकचंद शेठ, मा. तात्या पाटणे यांचे पुतळे त्यांच्या कार्याप्रमाणेच प्रेरणा देत आहेत. आज दसरा चौकातील हे वसतीगृह दक्षिण भारत जैन सभेच्या व जैन समाजातील शैक्षणिक क्रांतीची पताका घेऊन अभिमानाने उभे आहे. त्यामुळे संस्कार, प्रामाणिकपणा, सहजीवन यातून भावी पिढी घडविण्याचे कार्य हे बोर्डिंग करत आहे.

विद्यार्थी संख्या ही वाढल्याने अनेक असुविधा निर्माण झालेल्या आहेत. काही बाबतीत खाजगी निवास व व्यावसायिक संस्थांनी काढलेले वसतीगृह यामुळे विद्यार्थ्यांचा ओघ तिकडे वाढला आहे, हे सत्य नाकारता येत नाही.

कोल्हापुरातील वसतीगृहांप्रमाणेच कर्नाटकातील हुबळी व बेळगाव याठिकाणची वसतीगृहे जैन समाजाची कर्नाटकातील महत्त्वपूर्ण शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक केंद्रे बनली आहेत. या वसतीगृहांच्या स्थापनेनंतर तेथे चालू असलेले कोर्ट कचेरी प्रकरणांमुळे वसतीगृहे आर्थिक विवंचनेत सापडून प्रगती करू शकली नाहीत. दक्षिण भारत जैन सभेकडे उत्पन्नाच्या फारशा बाबी नसल्याने वसतीगृहांचा स्वतःचे उत्पन्न देणग्यांतून मिळवावे लागते. त्यामुळे १९७० पासून ही दोन्ही वसतीगृहे फारशी प्रगती करू शकली नाहीत. त्यानंतर नवीन कार्यकर्ते पर्याप्त उत्पन्न व नवीन योजना कार्यान्वित करू न शकल्याने वसतीगृहाला उतरती कळा लागली.

कोल्हापूरप्रमाणेच सांगली बोर्डिंग मात्र आपली प्रगती करीत आहे. १९१० साली या बोर्डिंची सुरूवात झाली. १९१८ नंतर मालकीची जागा मिळाल्याने नवीन इमारतीचे बांधकाम झाले. शेठ रामचंद धावडा यांनी दिलेल्या दानामुळे या इमारतीला त्यांचेच नाव १९२२ नंतर देण्यात आले. १९६५ पासून सांगलीच्या व कोल्हापूरच्या कार्यकर्त्यांमुळे तेथे नवीन इमारत बांधून आज जवळ जवळ वेगवेगळ्या शाखांतील १८० विद्यार्थी वास्तव्य करतात. १०० वर्षानंतर दक्षिण भारत जैन सभेचे ऑफीस आज सांगली येथे आहे. या वसतीगृहात सर्व सुविधा, दक्षिण भारत जैन सभेची कागदपत्रे, अन्नपुर्णा भोजनालय इत्यादीची सोय आहे. १९२३ साली सुरू झालेले इचलकरंजीचे वसतीगृह दोनतीन वर्षांनी बंद पडले. १९८६ नंतर पुन्हा हे वसतीगृह सुरू करण्यात आले. १९९० नंतर येथे विविध सर्टिफेटक कोर्स सुरू करण्यात आले.

दक्षिण भारत जैन सभेअंतर्गत एस.एस. भेरडी जैन बोर्डिंगमध्ये पुणे, धारवाड, आष्टा, निपाणी, जयसिंगपूर, देवरूख या जैन बोर्डिंगचा उल्लेख करावा लागेल. अनेक कारणांमुळे ही वसतीगृहे स्थापन होऊन उतरती कळेला लागून बंद पडली. बऱ्याच कारणांपैकी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष व स्थानिक वसतीगृहातील कार्यकर्त्यांची धरसोडवृत्ती याला जबाबदार होती.

दक्षिण भारत जैन सभेच्या अधिवेशनात पुरूषांबरोबर स्त्रियांना शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे मानले गेले. याची जाणीव पहिल्या परिषदेपासूनच झाली होती. १९०१ च्या कोल्हापूर स्टेट रिपोर्टमध्ये गोदुबाई उपाध्ये ही एकमेव जैन स्त्री साक्षर होती. त्यानंतर दक्षिण भारत जैन असभेअंतर्गत महिला कार्यकर्त्यांची एक मोठीच मालिका तयार झाली. १९०८ साली दिगंबर जैन बोर्डिंग अंतर्गत महिला वसतीगृह सुरू करण्यात आले. आजपर्यंत हे वसतीगृह सर्व सुविधांसह जैन मुलींना शिक्षण देते. त्याशिवाय शिवाजी विद्यापीठाला संलग्न असलेले बालवाडी कोर्स, शिवणकला कोर्स चालविते. गरीब मुलींसाठी 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत मोफत प्रशिक्षण दिले जाते.

दक्षिण भारत जैन सभेची वसतीगृहे, प्रशासन, व्यवस्थापन चोखपणे पार पाडल्यास त्यामध्ये ॲड. प्रतिभा पाटील, प्रा. कांचन कापसे, सुमतीबाई वडगावे, कुसूमताई कलशेट्टी इत्यादी अनेक महिला कार्यकर्त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. स्त्रियांनी शिकावे की शिकू नये या प्रश्नात १९ व्या शतकात गुरफटलेल्या जैन स्त्रियांनी या वसतीगृहातून शिक्षण घेऊन समाजामधील वेगवेगळ्या संस्थांमध्ये पदभार स्विकारला आहे.

श्रीमंती कळंत्रे या बालविधवा महिलेने १९२२ मध्ये तीन महिलांना घेऊन एक आश्रम सांगली येथे सुरू केले. पुरूष शिक्षणापेक्षा स्त्री शिक्षणावर जास्त भर दिला पाहिजे असे तिचे विचार होते. स्त्रियांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर तीन वर्षे त्यांनी आश्रमाची सेवा

करावी असा नियम होता. अनेक विधवा, निराश्रीत, दुबळ्या स्त्रियांनी या आश्रमाद्वारे स्वत:चा विकास केला. स्वतंत्र चळवळीच्या काळात सूत कातण्याचे काम, सर्की व पिंजणे इ. काम स्त्रियांनी केले. शिवाय क्रांतीकारकांना चोरून मदतसुद्धा केली. या संस्थेतून महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी कस्तुरबा आध्यापिका कॉलेज, सांगली सुरू करण्यात आले. सांगली, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा येथील स्त्रीया येथे शिक्षण घेत. तसेच सर्व धर्माच्या विद्यार्थिनींनी येथे शिक्षण घेतले. महात्मा गांधी शिशू विहार चालविला जाई. १९५३ ला लठ्ठे एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून सांगली येथील आश्रम फक्त महिला वसतीगृहाचे काम पाहू लागला. कळंत्रे आक्कांनी या आम्हाला चांगली अवस्था आणून दिली. १९८६ ला राजस्थानचे राज्यपाल मा. वसंतदादा पाटील यांच्या शुभहस्ते या महिलाश्रमाचे नामांतर 'श्रीमंतीबाई कळंत्रे जैन महिला आश्रम' असे ठेवण्यात आले. श्रीपालजी मंगवाळ यांनी आपले तीन मजली घर या आश्रमासाठी दान दिले. यानंतर दक्षिण भारत जैन सभेचे औरंगाबाद येथे सौ. सुमनबाई राजाभाऊ काला हे मुलींचे वसतीगृह १९९६ ला सुरू केले. त्यानंतर अरिहंत नगर येथे प्रत्येकी ३१ हजार रुपयांचे दान घेऊन १० हजार स्क्वेअर फुटाची इमारत पूर्ण केली. यानंतर कर्नाटक महाराष्ट्र सीमेवर कागल येथे श्रीमती सुशिलाबाई सदलगे यांनी १८ खोल्यांची इमारत मुलींच्या वस्तीगृहासाठी दिली. २ जाने. २००० रोजी येथे महिलाश्रम चालू झाले. पुणे येथे १९९० मध्ये स्थापन झालेले महिलाश्रम आर्थिक अडचणीमुळे १९९२ ला बंद पडले. पुढे १९९० ला औरंगाबाद येथील महिलाश्रम बंद पडले.

वसतीगृहांचे व्यवस्थापन दक्षिण भारत जैन सभेच्या नेतृत्वाखाली अधिक्षक सांभाळतात. तसेच वसतीगृहांचे व्यवस्थापन चेअरमन, सेक्रेटरी व सुप्रीटेंडेंट हे पदाधिकारी पाहतात. प्रा. शामराव वणकुंद्रे डॉ. ए. एन. उपाध्ये, प्राचार्य जी. के. पाटील, श्री. शामकांत पाटील, सध्याचे चेअरमन डी. ए. पाटील इत्यादी मान्यवर अधिक्षक लाभले. यामुळे सर्व वसतीगृहे पदाधिकाऱ्यांच्या निरपेक्ष कार्याने विकसित झाले.

वसतीगृहांमध्ये मासिक बैठका होऊन विद्यार्थ्यांच्या सोयीकडे लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांचे शिक्षण त्यांच्यावरील सुसंस्कार याच्यावर महत्त्वाचे विचार मांडले जातात. धार्मिक शिक्षण हा वसतीगृहांचा एक महत्त्वपूर्ण नियम आहे. बऱ्याचवेळेला धार्मिक शिक्षण द्यावे की नाही याबद्दल समाजात वाद निर्माण होतात. पण आजही लौकीक शिक्षणाबरोबरच नैतिकता व त्यातील धार्मिक शिक्षण ही गोष्ट वसतीगृहातील व्यवस्थापनाला सांभाळावी लागते.

'कमवा व शिका' या योजेनमुळे अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊ शकले. यामध्ये स्वच्छ भोजनालये, व्यायामशाळा, सुसज्ज ग्रंथालय ही वसतीगृहाची अविभाज्य भाग आहेत. ग्रंथालयांमध्ये शैक्षणिक साहित्य, नियतकालिके दैनिक वृत्तपत्रे, मासिके येतात. तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षा मार्गदर्शनसुद्धा केले जाते.

वसतीगृहाच्या अर्थव्यवस्थेत व विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या स्कॉलरशीपमध्ये समाजातून मिळालेल्या देणग्या ह्या वापरल्या जातात. अनेक वस्तीगृहाच्या बाबी म्हणून शहरातील इमारती दान मिळाल्या आहेत. त्यातून येणारे उत्पन्न हे व्यवस्थापनासाठी खर्च केले जाते. प्रत्येक वसतीगृहामध्ये जिनमंदिर स्थापन केले आहे. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक विकासासाठी विविध कार्यक्रम सभेद्वारे आयोजित केले जातात.

देणगीरूपाने मिळालेले शिक्षणफंड इतर कार्यासाठी वापरले जाते. १९६० नंतरच्या काळातमात्र स्कॉलरशीप फंडचे देणगीदार व रक्कम वाढलेली दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त स्कॉलरशीप देणे शक्य झाले आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या सामाजिक कार्यातून वसतीगृहाचे संस्कार दिसून येतात. १९७९ मध्ये दावणगिरी येथे वीरसेवादल या उपसंस्थेची स्थापना झाल्यापासून सर्व वसतीगृहांमध्ये वीरसेवादलाच्या शाखा स्थापन करण्यात आल्या तसेच महिला मंडळाची सभासुद्धा स्थापन झाल्या. सर्व

वसतीगृहांच्या आपआपल्या पदाधिकाऱ्यांद्वारे स्थानिक कार्यक्रमही आयोजित केले जातात. तसेच वसतीगृहांतून परिश्रमपूर्वक विविध कार्यक्रम, वार्षिक स्नेहसंमेलन, तज्ञांची व्याख्याने, क्रिडास्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामुळे या वसतीगृहातून निघणारे विद्यार्थी नेहमीच सुशिक्षित मानले जातात. २००५-०६ हे दक्षिण भारत जैन सभेच्या पहिल्या बोर्डिंगचा सुवर्ण महोत्सव म्हणून साजरा केला. याकाळात वसतीगृहांतर्फे विविध कार्यक्रम घेतले व स्मरणिका प्रकाशित केल्या. १९ व्या शतकातील दक्षिण भारत जैन सभेच्या कार्यामुळे २१ व्या शतकातील जैन समाज हा विसाव्या शतकातील बदलांमुळे प्रचंड बदललेला आहे. या संस्थेद्वारे बाहेर पडलेले विद्यार्थी समाजात विविध पदावर उच्चस्थानी पोहचलेले आहेत.

छत्रपती शाहू यांनी जैन बोर्डिंगच्या उद्‌घाटनाप्रसंगी बोलल्याप्रमाणे या बोर्डिंगमधून जैन समाजात डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक निर्माण होणार नव्हे तर लुप्त झालेल्या प्राचीन जैनांचे वैभव परंपरा व इतिहास यांचा ओघ पुढे चालू ठेवणारे व्यापारी आणि कुशल शेतकरी पुढे आणण्याचे कार्य जिद्दीने या संस्थेद्वारे सुरू केले आहे. याबद्दल त्यांनी अभिमान व्यक्त केला होता. पांगुळगाडा न घेता समाजातून उभारलेल्या दानातून जैन समाजाने या वसतीगृहाच्या माध्यमातून छ. शाहूंनी जी आशा व्यक्त केली होती ती बऱ्याच अंशी फलद्रूप झाल्याचे आजच्या जैन समाजाचे अवलोकन केल्यास सहज लक्षात येते.